स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

रोग मुक्ति, आरोग्य शक्ति.
सार्वजनिक आरोग्य विभाग

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
### जिल्हा रुग्णालय,नाशिक

जिल्हा रुग्णालय, अनंत कान्हेरे मैदान समोर, त्रंबकरोड नाशिक
दूरध्वनी क्र :- २५७२०३८ Email ID : cs_nashik@gmail.com

जा.क्र. जिरुना/अवै भांडार/रुग्णवाहिका टायर्स./ 38213-15 /२६ दिनांक ०६-१०-२०२६
06 OCT 2026.

प्रति,
मा. सह संचालक,
आरोग्य सेवा (खरेदी कक्ष),
मुंबई.

विषय :- दरपत्रक प्रसिध्द करणे बाबत....

मा. महोदय,

जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक व अधिनस्त कार्यालया मार्फत सन २०२६ - २०२७ मध्ये उपलब्ध होणाऱ्या जिल्हा नियोजन व विकास समिती खर्चाच्या अनुदानातुन नविन टयर्स इत्यादी बाबत दर मागविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी दरपत्रक मागविण्यासाठी सोबत दरपत्रक नमुना सादर करण्यात आला आहे.

तरी सदर ई - दरपत्रक आरोग्य सेवेच्या ई - पोर्टलवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

(डॉ. सतिषकुमार वसंत शिंपी)
जिल्हा शल्य चिकित्सक,नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
मा.सहसंचालक , खरेदी कक्ष , आरोग्य सेवा, संचालनाय, मुंबई.
मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ , नाशिक.

# जाहीर नोटीस ( दरपत्रक निमंत्रित पत्र )

सुचित करण्यात येते की, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक यांचे कार्यालयामार्फत सन २०२६-२०२७ मध्ये उपलब्ध होणा-या DPDC खर्चाच्या अनुदानातुन सोबत जोडलेल्या यादीतील जिल्हा रुग्णालयाच्या व अधिनस्त रुग्णालयातील रुग्णवाहीका टायर्स इत्यादी करण्यासाठीचे कामकाजाचे दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी ईच्छुक पुरवठाधारकांनी खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके मोहर बंद लिफाप्यात विहित कालावधीत प्रशासकिय कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी .

दरपत्रके सादर करणा-या पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती

१. इच्छुक पुरवठाधारकांनी बाब निहाय ( Itemwise ) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत. यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर पत्रक सादर केलेले आहे. त्याचे नांव ठळक अक्षरात असावे.

२. एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबंधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. उदा जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती ज " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्या भागधारक असेल तीच व्यक्ती " कंपनी एक्स" चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्या भागधारक असेल तीच व्यक्ती " कंपनी वाय " ची मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक नसावी.

३. यादीत विर्निदिष्ट जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा रुग्णालयाच्या व अधिनस्त रुग्णालयातील रुग्णवाहीका टायर्स इत्यादी करण्यासाठीचे कामकाजा बाबतचा पुर्वानुभव दाखला जोडण्यात यावा.

४. निर्माणकर्त्याचा अधिकृत विक्रता, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील. दरपत्रकात पुरठा करण्यात येणा-या बाबी बददलची सविस्तर माहिती जसे मॉडेल, मेक इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे.निर्माणकर्ता ( Manufaturer) यांचे अधिकृत विक्रता / ठोक व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक ( GST Number ) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकित प्रत जोडावी.

६. संस्था / दुकान शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, साहित्य पुरवठा / विक्री विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

७. दरपत्रके सादर करण्यासाठी पत्ता / ठिकाण - प्रशासकिय कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक पीन कोड ४२२००१

८. यादीमधील जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा रुग्णालयाच्या व अधिनस्त रुग्णालयातील रुग्णवाहीका टायर्स इत्यादी करण्यासाठीचे कामकाजचे आवश्यकते नुसार आदेश निर्गमित केले जातील.

९. विहित कालवधीत पुरवठा न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

१० विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील, दर हे सर्व करांसहीत व उचल ठेव हमाली पोहच खर्चासहीत असावे.

११. मंजूर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकाकडून वसुल केली जाईल.

१२. जिल्हा रुग्णालयाच्या व अधिनस्त रुग्णालयातील रुग्णवाहीका टायर्स इत्यादी करण्यासाठीचे कामकाजाचा दर्जा हा सर्वउत्तम असावा. दर्जा हा सर्वोत्तम असावा. वस्तू हया आय.एस.आय. मार्क किंवा आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक असावा.

१३. ईच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकलेले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१४. दरपत्रक स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल ( कार्यालयीन सुटटी वगळूण ) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१५. दरपत्रके उघडण्याची प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५ नंतर ६ वाजे पर्यंत राहील किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१६. कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपूर्ण अथवा काही भागांबाबत ( काही वस्तुंबाबत ) खरेदी प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर एक वर्षासाठी वैध राहतील.

१७.सर्व कागदपत्रे दस्तएवज हे साक्षांकीत केलेले असावेत.

( डॉ. सतिषकुमार शिंपी )
जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक

To be submitted on Original letter head/pad

Annexure-६

निविदाकाराचे हमी पत्र

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाम/उद्योग-४ दिनांक ०१ डिसेबंर २०१६ नियम ४.२.५ नुसार मी/ आम्ही..................................................या हमीपत्राद्वारे लिहुन देतो की, दरपत्रक मागविण्या-या खरेदी प्राधिका-याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नरुन हितसंबधाबाबत संघर्ष नाही तसेच खरेदी प्राधिका-याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असुन दुस-या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तीक किंवा संगनमताने साखळी करुन दरपत्रक भरलेले नाही असे आढळुन आल्यस नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक

ठिकाण

दरपत्रक सादर कर्त्याची स्वाक्षरी व शिक्का

# व्यापारी लिफाफा

जिल्हा रुग्णालयाच्या व अधिनरस्त रुग्णालयाती रुग्णवाहीका टायर्स बाबत

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दर एका नगास रु. (GST Extra) | दर प्रत्येकी एका नगास अक्षरी रुपये (GST Extra) |
|---|---|---|---|
| 1 | Force Traveller Ambulance | | |
| 2 | Tata Winger Ambulance | | |

१.दरपत्रके सिलबंद करुन प्रशासकिय कार्यालय,जिल्हा रुग्णालय नाशिक येथे पाठविण्यात यावे.

२.दरपत्रके मंजूर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय,नाशिक यांनी राखून ठेवले आहे.

सही

पुरवठा धारकांचे नांव

पुरवठा संस्थेचे नांव

पत्ता